**Permission Letter of Maharashtra Government**

महाराष्ट्र शासन

क्र. एनजीसी २०००/नमवि/(१/३०००)/मशि-३.
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २९ जून, २०००.

प्रति,
कुलसचिव,
अमरावती विद्यापीठ,
अमरावती.

विषय : सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालय— <u>सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.</u>

संदर्भ : कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे पत्र क्र. अवि/८/सी-२७२५/९९, दिनांक २८.१२.१९९९

महोदय,

सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालये सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत आपल्या विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या शिफारशींचा विचार करुन खालील संस्थेस त्यासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व दर्शविलेल्या विद्याशाखेचे नवीन महाविद्यालय सुरु करण्यास महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ च्या कलम ८२ (५) च्या तरतुदीनुसार शासनातील तथा आसपासच्या परिसरातील वाढती लोकसंख्या विचारात घेऊन उच्च शिक्षणाची सुविधा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून शासनाची परवानगी देण्यात येत आहे. :-

| संस्थेचे नाव | ठिकाण | विद्याशाखा |
|---|---|---|
| यवतमाळ जिल्हा विकास समिती, बस स्टॅण्ड रोड, यवतमाळ | धामणगाव रोड, यवतमाळ | कला (सहशिक्षण) |

- सदर महाविद्यालयास देण्यात आलेली परवानगी सध्या विना अनुदान तत्वावर असून, वेळोवेळी निर्गमित करण्यात येणा-या अनुदान संदर्भातील शासन निर्णयाच्या अटींच्या अधिन राहून या महाविद्यालयास अनुदान तत्वावर आणण्याचा यथावकाश विचार करण्यात येईल.

(कृपया मागे पहा.)

## Permission Letter of Maharashtra Government

६. शिक्षक व शिक्षकेतर पदांवरील नियुक्त केलेले कर्मचारी शासनाच्या व विद्यापीठांच्या आदेशानुसार सेवाप्रवेशाच्या अटी पूर्ण करणारे असावेत. शिक्षक संवर्गातील नेमणूकांना विद्यापीठाची मान्यता प्रदान केलेली असावी. मागासवर्गीय संवर्गाच्या आरक्षणाबाबत असलेल्या तरतूदीचे पालन करावे.

७. शासन निर्णय क्रमांक एनजीसी/१२७७/१२२११६/३२/सेल दि.२१-९-७७ व शासन परिपत्रक क्रमांक एनजीसी/१०९६/८१५८/४१२६/विशी-४,दि.१९-४-९७ अन्वये महाविद्यालयास देण्यात येणारा वेतनाचा धनादेश बॅकेत/वेतन खात्यात जमा करण्यात येत असेल. त्याच बॅकेत त्या महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वैयक्तिक खाते उघडणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे महाविद्यालयाचे बॅकेत जमा होणाऱ्या वेतनाच्या रक्कमेतूनच संबंधित कर्मचाऱ्यांच्या खाती नियमाप्रमाणे वेतनाची रक्कम ट्रान्सफर करणे आवश्यक आहे. याप्रमाणे संबंधित महाविद्यालये काटेकोरपणे कार्यवाही करीत आहे याची खात्री करून घ्यावी.

८. महाविद्यालयांच्या मान्यतेबाबत/संलग्निकरणाबाबत शासनाने/विद्यापीठाने विहित केलेल्या सर्व अटींची पूर्तता केलेली आहे

९. संबंधित महाविद्यालयांनी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या/करणाऱ्या आदेशाचे पालन करणे आवश्यक आहे.

१०. ज्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नेमणूक केली आहे ते शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी उच्च माध्यमिक विद्यालयात/माध्यमिक शाळेत संस्थेत पूर्णवेळ किंवा अर्धवेळ काम करीत नाही.

११. संस्थेने महाविद्यालयांसाठी स्वतःच्या मालकीच्या पुरेशा इमारतींची वर्गखोल्या व इतर भौतिक सुविधांच्या सोयी उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

१२. विद्यापीठांची रितसर परवानगी घेवून पूर्णवेळ प्राचार्याची निवड समितीव्दारा नेमणूक करणे आवश्यक आहे.

१३. संस्थेविरूध्द कोणत्याही तक्रारी नसाव्यात व न्यायालयीन प्रकरणे नसावीत. शासनाने वेळोवेळी घालून दिलेले नियम व निकष यांचे संस्थेने तंतोतंत पालन करावे.

१४. ज्या महाविद्यालयांना आर्थिक वर्षात रूपये २५ लाख किंवा त्याहून अधिक रकमेचे अनुदान देय होईल, अशा महाविद्यालयांनी सी.ए.जी.(डी.पी,सी.) अधिनियम १९७१ मधील परिच्छेद १४ नुसार महालेखापाल यांच्या लेखापरिक्षा पथकाकडून लेखापरिक्षण करणे बंधनकारक राहील.

१५. शासन निर्णय क्रमाक एनजीसी/१०९३/(५९१८)/मशि-३,दिनांक १९.६.१९९५ अन्वये कार्यभार मंजूर करताना एका तुकडीतील शासनाने मंजूर केलेली विद्यार्थी संख्या विचारात घ्यावी.

१६. कॉम्प्युटर सायन्स/अभियांत्रिकी विज्ञान व तद्नुषंगिक विषयही पदवी स्तरावर विज्ञान व वाणिज्य विज्ञानशाखांकडे विषय म्हणून कायम विना अनुदान तत्वावर मंजूर करण्यांत येतात. नवीन महाविद्यालयांच्या प्रस्तावात अथवा अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात नवीन विद्याशाखा सुरु करण्याच्या प्रस्तावावर विद्यापीठाने हे विषय दिले असल्यास ते कायम विना अनुदान तत्वावर आहेत असे समजावे.

वरील महाविद्यालयाला वेतनावर होणारा खर्च खाली नमूद केलेल्या अर्थशिर्षाखाली दाखवून तो सन २००९-२०१० मधील आर्थिक तरतूदींमधून भागविण्यात यावा. तसेच जिल्हा नियोजन व विकास मंडळाकडून तरतूद उपलब्ध झाली तरच अनुदान अदा करण्यांत यावे.

**"लेखाशिर्ष – २२०२-सर्वसाधारण शिक्षण-०३-विद्यापीठीय उच्च शिक्षण १०४ अशासकीय महाविद्यालयांना सहाय्य पंचवार्षिक योजनांतर्गत योजना १०४ (२) अशासकीय महाविद्यालयांना व संस्थांना सहाय्य-अशासकीय कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयांना विस्तारासाठी अनुदाने (२२०२-०९०५) ३५ सहाय्यक अनुदाने (वेतन) मागणी क्रमांक डब्ल्यू-२".**

(डॉ.अ.वि.किर्दक),
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य,पुणे-१.

प्रति -

१ सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती
२ महालेखपाल (लेखापरिक्षा) महाराष्ट्र नागपूर
३. महालेखपाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, नागपूर
४ जिल्हा कोषागार अधिकारी, यवतमाळ.
५ मा.प्रधान सचिव उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
६.प्राचार्य,नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय,धामणगांव रोड,यवतमाळ.